छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका
☎: 2333536-40, 2348001-05 (P.B.X.), 2331281, 2331283
Fax : (0240) - 2331213

जा.क्र. मनपा/भांडार/2026/06 दिनांक :- 21 /04/2026

## दरपत्रक सुचानापत्र

प्रती,

------------------------

------------------------

**विषय :- खालील नमुद केल्यानुसार दरपत्रक सादर करणे बाबत.**

वरीलप्रमाणे आपणास कळविण्यात येते की, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांना खाली नमूद केल्यानुसार व दिलेल्या विवरणानुसार /प्रत्यक्ष दिलेल्या सुचनेनुसार साहित खरेदी करणे आहे.


| अ. क्र. | साहित्याचे नांव निकषासह | प्रमाण | दर सर्व करांसहित प्रती नग/हजार |
|---|---|---|---|
| 1 | हॅण्डबील A4 साईज (मराठी/उर्दु) सोबत दिलेल्या नमून्यानुसार | प्रती हजार | |
| 2 | स्टिकर्स (9.5 X 7.5 CM) फोर कलर मध्ये सोबत दिलेल्या नमून्यानुसार | प्रती नग | |
| 3 | प्रमाणपत्र A4 साईज | प्रती नग | |

सदर साहित्याचे दरपत्रक सिलबंद करुन दिनांक 23 /04/2026 पर्यंत मध्यवर्ती भांडार विभागात सादर करावे. वेळेच्या आत न आलेल्या दरपत्रकांचा विचार करण्यात येणार नाही. तसेच आपणास प्रत्यक्ष दिलेल्या सुचनेनुसार/आदेशानुसर साहित्याचा पुरवठा करावा लागेल.

सहाय्यक आयुक्त (भांडार)
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

प्रत :-
1. मा.उप आयुक्त-6 तथा विभाग प्रमुख, छत्रपती संभाजीनगर मनपा यांना माहितीस्तव सादर.
2.सिस्टीम मॅनेजर, संगणक विभाग, यांना मनपाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्याच्या कार्यवाहीस्तव.

# छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका



(आरोग्य विभाग)

## किटकजन्य आजार प्रतिबंधात्मक उपाययोजना

छत्रपती संभाजीनगर शहरात डेंग्यू, चिकनगुन्या आजाराचा प्रादुर्भाव होऊ नये म्हणून नागरिकांनी खालील प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात.

**चिकनगुन्या व डेंग्यू आजाराबाबत माहिती :**

चिकनगुन्या व डेंग्यू हे विषाणूजन्य (व्हायरल) आजार आहेत, हे आजार विशिष्ट प्रकारचा म्हणजे ''एडिस इजिप्टाय'' हा डास चावल्याने होतात.

**''एडिस इजिप्टाय'' या डासाची उत्पत्तीस्थाने :**

''एडिस इजिप्टाय'' डास साठवलेल्या स्वच्छ पाण्यात अंडी घालतो. याची उत्पती खालीलप्रमाणे असू शकते.

- ❖ घरातील वापरात नसलेले कुलर्समधील पाणी, फूलदाण्या, घरातील मनीप्लँटच्या बाटल्या, छतावर पडलेले निकामी भांडे, निकामी बाटल्या, नारळाच्या करवंट्या, सांडपाण्याचे खूप दिवस स्वच्छ न केलेले हौद, पिण्याच्या पाण्याच्या स्वच्छ न केलेल्या गच्चीवरील झाकण नसलेल्या टाक्या.
- ❖ टायर्सची दुकाने, निकामी टायर्स /एकमेकांवर रचून ठेवलेल्या टायर्समध्ये साठलेले पावसाचे पाणी.
- ❖ बांधकाम चालू असलेली ठिकाणे. ❖रस्त्यावर साचलेले पाणी इत्यादी.

**चिकनगुन्या व डेंग्यू : लागण व प्रसार :**

निरोगी व्यक्तीस दूषित ''एडिस इजिप्टाय'' डास चावल्यावर या आजाराची लागण होते. माणसापासून माणसाला हा आजार पसरत नाही.

**चिकनगुन्या आजाराची लक्षणे :**

ताप, तीव्र सांधेदुखी, क्वचित अंगावर पुरळ, डोकेदुखी इत्यादी.

**डेंग्यूची लक्षणे :**

ताप, तीव्र डोकेदुखी, अंगदुखी, मळमळ, उलट्या, अंगावर पुरळ व तीव्र प्रकारात रक्तस्राव व बेशुदधावस्था (डिएसएस)


**डेंग्यू व चिकनगुन्या यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना :**

''एडिस इजिप्टाय'' डासांची उत्पतीस्थाने नष्ट करणे.

- ❖ घरातील कुलर्स मधील पाणी, फुलदाण्यातील पाणी, मनीप्लँटमधील पाणी, आठवड्यात कमीत कमी एकदा बदलावे.
- ❖ आठवड्यातून एक दिवस कोरडा पाळावा, घरातील सांडपण्याचे भांडे आठवड्यात एकदा स्वच्छ घासूनच कोरडे करून त्यात ताजे पाणी भरावे व भांडे घासतांना भांड्याचा तळ घासला जाईल याची काळजी घ्यावी तेच पाणी परत वापरावयाचे असल्यास दोन पदरी कपड्याने गाळून ते वापरावे. हौद, गच्चीवरील टाक्या यांना नेहमी झाकण असावे जेणेकरून त्यात डास अंडी घालणार नाही.
- ❖ सांडपाण्यामध्ये महापालिकेच्या कर्मचाऱ्यांकडून ''ॲबेट'' हे डास अळीनाशक औषध टाकून घ्यावे. सांडपाण्याचे हौदातील पाणी बदलणे शक्य नसल्यास त्यात गप्पी मासे सोडावेत.
- ❖ घर व परिसर नेहमी स्वच्छ ठेवावा.
- ❖ नागरिकांनी आपल्या घरात किंवा परिसरात किंवा शहरात कोठेही डासाची उत्पती स्थाने दिसल्यास त्याची माहिती त्वरीत मनपास द्यावी.

**वैंयक्तिक पातळीवर घ्यावयाची खबरदारी :-**

१. ''एडिस इजिप्टाय'' डास दिवसा चावत असल्यामुळे रात्री व दिवसासुद्धा डास प्रतिबंधात्मक उपायोजना म्हणून मलम, उदबत्त्या, वड्या यांचा वापर करावा.
२. दिवसा व रात्री झोपतांना पूर्ण बाह्यांचे व पूर्ण पाय झाकतील असे कपडे घालावेत.
३. रात्री झोपतांना मच्छरदाणीचा वापर करावा.
४. चिकनगुन्या किंवा डेंग्यूचा संशयित रुग्ण आढळल्यास त्वरीत महानगरपालिकेच्या नजिकच्या आरोग्य केंद्रावर/रुग्णालयात संपर्क साधावा. येथे या आजारावर औषध उपलब्ध आहे. गप्पी मासे हवे असल्यास आपण आपल्या भागातील मलेरिया कर्मचारी यांच्याशी संपर्क साधावा.
५. घरातील सांडपाण्यात ॲबेट/टेमीफॉस हे डास अळी प्रतिबंधात्मक औषध टाकून घ्यावे. घरात/परिसरात पाणी साचू देऊ नये.
६. महानगरपालिकेतर्फे धूर फवारणी, औषध फवारणी, ॲबेट वाटप करणाऱ्या कर्मचाऱ्यांना सहकार्य करावे.
७. खाजगी वैद्यकीय व्यावसायिकांनी डेंग्यू किंवा चिकनगुन्याचा संशयित रुग्ण आढळल्यास 24 तासांच्या आत मनपा आरोग्य विभागास कळविणे बंधनकारक आहे.
८. e-mail : fwsipamcabd@yahoo.co.in



# چھترپتی سنبھا جی نگر میونسپل کارپوریشن

## (شعبۂ صحت)

## مچھر اور دوسرے جراثیم سے ہونے والی بیماری ختم کرنے کا منصوبہ

## ضروری اعلان

تمام شہریان کو مطلع کیا جاتا ہے کہ ''ڈینگو'' یا چکن گنیا مرض سے بچنے کیلئے مندرجہ ذیل اہم تدابیر پر عمل کریں اور میونسپل کارپوریشن چھترپتی سنبھاجی نگر کو تعاون کریں۔

☆ ڈینگو اور چکن گونیا یہ مرض ''ایڈیس ایجپٹائے'' نامی مچھر کے کاٹنے سے ہوتا ہے۔

☆ یہ مچھر صاف پانی میں انڈے دیتا ہے۔ ☆ ڈینگو وائرس میں مبتلا مچھر کے کاٹنے سے ہی یہ مرض لاحق ہوتا ہے۔

## مچھر کی پیدائش کے مقامات

۱) گھر کے قریب بہتا پانی، حوض، ٹانکی، رنجن، مٹکے وغیرہ۔ ۲) پرانے ٹائر میں جمع ہوا پانی۔ ۳) ناریل کے چھلکے اور قول۔

۴) منی پلانٹ کے کنڈے، باٹلی۔ ۵) باغیچے کے گڑھے۔ ۶) تعمیری کام کی جگہ۔

## ڈینگو مرض کے آثار

شدید بخار آنا، سَر درد ہونا، بے چینی، ہونا، قئے آنا، جوڑوں میں درد ہونا، آنکھوں کے حلقوں درد ہونا، خون کا دباؤ کم ہونا، کمزوری محسوس ہونا۔

## چکن گنیا مرض کی علامت

بخار، جوڑوں میں درد، بدن پر نشانات آنا، سر درد ہونا وغیرہ

## احتیاتی تدابیر

۱) گھر میں کولر، کنڈیاں، منی پلانٹ کا پانی ہفتے میں ایک بار بدلنا چاہیے۔

۲) ''ایڈیس ایجپٹائے'' مچھر دن میں ہی کاٹتا ہے اسلئے دن میں بھی مچھر بتی، مرہم وغیرہ کا استعمال کریں۔

۳) ہفتہ میں ایک بار سوکھا دن منانا چاہیے۔ یعنی تمام پینے کے، پکانے کے پانی کے برتن خالی کر کے دھونا اور سکھانا، پھر چھان کر پانی بھرنا۔

۴) پانی کے تمام برتن ڈھانپ کر رکھیں۔

۵) چھوٹے بچوں کو دن میں بھی مچھردانی میں سلائیں۔

۶) گھر کے اطراف نیم کا پتہ اور ناریل کے چھلکے جلائیں تاکہ مچھر داخل نہ ہو۔

۷) ڈاکٹر کے مشورے کے بغیر کوئی دوا نہ لیں۔


۸) ڈینگو بیماری کی دوا۔ میونسپل کارپوریشن اور سرکاری دواخانوں میں دستیاب ہے۔


۹) خانگی دواخانے چلانے والوں سے اپیل ہے کہ اگر انکے پاس ڈینگو اور چکن گنیا بیماری کا مریض آئے تو فوراً ۲۴ گھنٹوں کے اندر کنٹرول روم پر اطلاع دیں۔

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

## आरोग्य विभाग

# एडीस डासांचे उत्पत्ती चक्र





अंडी — अळी — कोष — डास

**एडीस डासांची उत्पत्ती स्वच्छ घरगुती पाणी साठ्यांमध्ये होते.**
**या डासांमुळे डेंग्यु / चिकुनगुनिया या आजारांचा प्रसार होतो.**

**महत्वाची सुचना - पाण्याचे साठे आठवड्यातून किमान एकदा घासून-पुसून स्वच्छ करा, झाकणे बसवा, कापडाने झाका व डासांची उत्पत्ती थांबवा**